## ४१. मेहेरही स्मरावा

मेहेरही स्मरावा । मेहेर आळवावा ॥धृ.॥
मेहेर साठवावा । हृदयांत जागवावा ॥

ध्यानी मनीही स्वप्नी । मेहेरही दिसावा ।
मेहेर ध्यास घ्यावा । मेहेरही विसावा ॥१॥

ते रूप आठवीता । हरती अनेक चिंता ।
आनंद होई चित्ता । ऐसा अमोल ठेवा ॥२॥

स्मरताही सूख होई । दुःखास वाव नाही ।
मधुसूदना ही ग्वाही । मेहेर मंत्र ध्यावा ॥३॥

Scanned by CamScanner